**शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,**
डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/४०५/२०२४-२०२५/४२५४ दि.१०/०७/२०२५

प्रति,

१. प्रशासकीय अधिकारी,
प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालीका
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/ अहिल्यानगर/ सोलापूर

विषय :- राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये "मित्र उपक्रम" कार्यान्वित करणेबाबत..
संदर्भ :- 1. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे परिपत्रक क्रमांक- संकीर्ण २०२४प्र.क्र.१२६/एस.डी.४ दि.१४.०३.२०२४
२.विपश्यना रिसर्च इन्स्टिट्युट, धम्मगिरी, इगतपुरी यांचे दि.०४.०७.२०२५ रोजीचे पत्र
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०११(२९६/११)/ माशि-३, दि.२७.०१.२०१२
4. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडील पत्र क्र.आशिका/स्वियं/मित्र उपक्रम/२०१९-२०२०/४८५६ दि.०८.०८.२०१९

उपरोक्त विषयानूसार राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये विपश्यना आनापान साधना वर्ग सुरु करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी शासन परिपत्रक दि.०५.१०.२०११ अन्वये आदेश निर्गमित केले होते. सदरचा कार्यक्रम राज्यातील सर्व इ.५ वी ते इ.१० वीपर्यंत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक वाढीकरिता उपकारक ठरणार असल्याने त्यास संदर्भ क्र.3 वरील शासन परिपत्राकान्वये विहित केलेल्या विपश्यना आनापान साधना वर्गास "मित्र उपक्रम" (Mind In Training For Right Awareness) या नावाने संबोधण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. विपश्यना आनापान साधनेच्या दैनंदिन सरावामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, स्मरणशक्ती, निर्णयक्षमता विकसित होऊन अध्ययन क्षमता वृद्धिंगत होईल, या हेतूने या उपक्रमाची अंमलबजावणी सर्व शाळांमध्ये करण्याबाबत विपश्यना रिसर्च इन्स्टिट्युट, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक यांनी संदर्भिय पत्रान्वये विनंती केलेली आहे.

तरी संदर्भिय पत्रानूसार "मित्र उपक्रम" राबविण्याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील अधिनस्त शाळांना अवगत करावे.

सोबत :- संदर्भिय पत्र

१०/०७/२०२५
(डॉ. गणपत मोरे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव
१. सर्व कटक मंडळ, पुणे, अहिल्यानगर, सोलापूर
२. व्यवस्थापक, विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट, धम्मगिरी, इगतपुरी, जि. नाशिक(मित्र उपक्रम)
३. व्यवस्थापक, पुणे विपश्यना समिती, दादावाडी, आनंद मंगल कार्यालयामागे, स्वारगेट, पुणे (मित्र उपक्रम)